## राष्ट्रीय सेवा योजना
## २०२३-२०२४
## पुणे विद्यापीठ, पुणे
## नियमित कार्यक्रम अहवाल

महाविद्यालयाचे नाव व पत्ता :- ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे.

प्राचार्यांचे नाव व फोन नंबर :- डॉ.आनंद भवानीदास कुलकर्णी.
मो. ९५२७३७९२७७ / ०२१३२ – २४२५८५२

कार्यक्रम अधिकारी नाव व फोन नंबर :- प्रा. स्वप्निल कांबळे. मो. ८४४६२५२९५१
प्रा. डॉ. श्रीकांत फुलसुंदर मो. ९८६०२८६४११
प्रा. सौ. वैशाली मोढवे मो. ९९७०५०२३१३

स्वयंसेवक युनिट संख्या (B-10): २५० (अक्षरी – दोनशे पन्नास )

मुले – मुली

| Castwise | SC | ST | Other | Total |
|---|---|---|---|---|
| Male | 8 | 7 | 67 | 82 |
| Female | 6 | 11 | 151 | 168 |
| Total | 14 | 18 | 218 | 250 |

उपक्रमांसाठी संलग्न संस्था/ घटक : मनोहर डोळे फाउंडेशन, नारायणगाव,
रोटरी क्लब ऑफ नारायणगाव,
ग्रामपंचायत नारायणगाव मौजे बोरी बुद्रुक,
अक्षय ब्लड बँक पुणे.

**नियमित कार्यक्रम अहवाल :**

शैक्षणिक वर्ष 2023-24 या वर्षात महाविद्यालयातील रा.स.यो. च्या वतीने नियामित उपक्रमांतर्गत स्वयंसेवक व इतर संस्था/ घटकांच्या सहकार्याने राबवलेल्या महत्वाच्या व ठळक उपक्रमांची माहिती पुढीलप्रमाणे –

दिनांक 5 जून 2023 रोजी वृक्षारोपण करण्यात आले त्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या 250 स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

दिनांक 21 जून 2023 रोजी योग दिवस साजरा करण्यात आला यामध्ये महाविद्यालयातील सुमारे 200 विद्यार्थी आणि प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

दिनांक 15 ऑगस्ट 2023 रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त पुणे जिल्ह्याचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा या नाट्यमय नृत्य कार्यक्रमाचे सादरीकरण राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी केले यामध्ये सुमारे 53 राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक सहभागी झाले.

दिनांक 19 ऑगस्ट 2023 रोजी मेरी माटी मेरा देश अभियानांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या मोहिमेत सुमारे 4000 वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.

दिनांक 28 सप्टेंबर 2023 रोजी गणेश विसर्जना निमित्त निर्माले संकलन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले सुमारे 2 टन निर्माल्य स्वयंसेवकांच्या मार्फत गोळा करण्यात आले या उपक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे 60 स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी झाले.

दिनांक 1 ऑक्टोबर ते 7ऑक्टोबर 2023 दरम्यान वन्यजीव सप्ताहाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि वनविभाग जुन्नर च्या वतीने वन्यजीव संवर्धन विषयक पथनाट्य सादरीकरण करण्यात आले.

दिनांक 5 ऑगस्ट 2023 रोजी क्रांती दिनानिमित्त रक्तदानाचा महायज्ञ या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी ,प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला व रक्तदान केले.

दिनांक 14 ऑक्टोबर 2023 रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे व ग्रामोन्नती मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि विद्यार्थी विकास मंडळ च्या वतीने मेरी माटी मेरा देशं कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले या कार्यशाळेमध्ये सुमारे 750 विद्यार्थी उपस्थित राहिले.

दिनांक 15 ते 24 ऑक्टोबर 2023 नवरात्री महोत्सवानिमित्त मुक्ताई मंदिर नारायणगाव येथे सुमारे 70 राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थिनी पोलीस मित्र म्हणून सकाळी पहाटे चार ते सात यादरम्यान अनुशासन व गर्दी नियंत्रणाचे काम केले.

दिनांक एक डिसेंबर ते सात डिसेंबर 2023 दरम्यान जाणीव जागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले यामध्ये प्राथमिक उपचार केंद्र नारायणगाव व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक सहभागी झाले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक साहिल वालकोळी आणि आकाश भारद्वाज अनुक्रमे हे दोन विद्यार्थी आव्हान राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिर, गडचिरोली व राष्ट्रीयस्तरीय शिबिर हतकोटी हिमाचल प्रदेश येथे सहभागी झाले.

दिनांक 18 जानेवारी ते 24 जानेवारी 2024 शैक्षणिक वर्ष 2023 -2024 चे राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन मौजे बोरी बुद्रुक तालुका जुन्नर या ठिकाणी करण्यात आले.

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग उल्लेखनीय कामगिरी

मेरी माटी मेरा देश अभियानांतर्गत सेल्फी विथ माती या उपक्रमामध्ये ग्रामोन्नती मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी सुमारे 18500 सेल्फी फोटोज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सेल्फी विथ माती गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड करण्यासाठी जमा केले विशेष म्हणजे एवढ्या मोठया संख्येने सेल्फी फोटोज महाराष्ट्रातून नव्हे तर पूर्ण भारत देशातून जमा करणार पहिले महाविद्यालय नारायणगाव महाविद्यालय म्हणून ओळखले गेले. आणि या उपक्रमासाठी ग्रामोन्नती मंडळाचे संस्था पदाधिकारी प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांचा महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण विभाग आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्यावतीने विशेष सन्मान करण्यात आला.

अशी उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे महाविद्यालयातील 12 राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक आणि दोन कार्यक्रम अधिकारी मेरी माटी मेरा देश अभियान समारोप कार्यक्रमासाठी नवी दिल्ली येथे सहभागी झाले.

सारांश रूपाने रासेयो अंतर्गत वरील विशेष उपक्रमानाव्यातिरिक्त महाविद्यालय पातळीवर **श्रमदान, व्यक्तिमत्व विकास, गटचर्चा, गिरीभ्रमन,** यासारखे उपक्रम शैक्षणिक वर्ष **2023-24** मध्ये राबविण्यात आले.

**प्रभारी प्राचार्य**
**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**
**नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे**

**कार्यक्रम अधिकारी**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**
**नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे**